।। श्री ।।

आपली भूमी.. आपला आवाज...

वीरभूमी

संपादक : महादेव दळे

*** सुविचार ***

परिस्थिती कशीही असो,
चेहऱ्यावरचं हास्य कधीही
कमी होऊ देऊ नका.

अहिल्यानगर ■ रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक १२७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145 www.veerbhuminews.com

SPOT NEWS

सोने-चांदीच्या दरात मोठी घसरण

● **जळगाव** – गेल्या काही दिवसांपासून सोने आणि चांदीच्या दरात सातत्याने घसरण होताना दिसत आहे. आजही या दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमती कमी झाल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. सोन्याच्या दरात तब्बल दीड हजार रुपयांची, तर चांदीच्या दरात एक हजार रुपयांची घट झाली आहे. त्यामुळे सध्या बाजारात सोने आणि चांदी खरेदी करण्यासाठी ग्राहकांची घाई दिसत नसून अनेक जण दर आणखी कमी होण्याची वाट पाहत आहेत. जळगावच्या सराफा बाजारात सोन्या-चांदीच्या दरात मागील काही दिवसांपासून चढ-उतार सुरू आहेत. जागतिक बाजारात होणा-या बदलांमुळे सोन्या-चांदीच्या दरात सतत बदल होत आहेत. जळगाव सराफा बाजारातील उपलब्ध दरानुसार, २० तारखेला २४ कॅरेट सोन्याचा दर १ लाख २३ हजार ५०० रुपये होता. तर चांदीचा दर १ लाख ५५ हजार रुपये होता. २१ तारखेला सोन्याचा दर १ लाख २३ हजार रुपये, तर चांदीचा दर १ लाख ५४ हजार रुपये नोंदवण्यात आला. सोन्या-चांदीच्या किमतीत घट होत असली तरी पुढील काळात दर आणखी कमी होतील की पुन्हा वाढतील, याबाबत निश्चित सांगता येत नाही. त्यामुळे ग्राहक सध्या खरेदीचा निर्णय विचारपूर्वक घेत आहेत.

हेल्थ सप्लिमेंटस्, प्रोटीन पावडरला एफडीएचा चाप!

● **मुंबई** – तरुणाईमध्ये वाढती बॉडीबिल्डिंगची क्रेझ आणि सोशल मीडियावर होणा-या भुलभुलैया जाहिरातींमुळे हेल्थ सप्लिमेंटस्चा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, वैद्यकीय सल्ल्याविना होणा-या या सेवनामुळे तरुणांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पत्रकार परिषद घेत राज्यात हेल्थ सप्लिमेंट्स, प्रोटीन पावडर, मल्टी व्हिटॅमिन गोळ्या, न्यूट्रास्युटिकल्स आणि विशेष आहाराबाबत कडक नियमावली लागू केल्याची घोषणा केली. प्रोटीन पावडर, मल्टी-व्हिटॅमिन गोळ्या, वजन घटवणा-या गोळ्या, क्रीडा पूरक आहार आणि हर्बल प्रोडक्ट्सची बाजारात मोठ्या प्रमाणात विक्री सुरू आहे. मात्र, या उत्पादनांमध्ये मूळ पदार्थ वेगळाच असतो आणि विक्री मात्र वेगळ्याच नावाने केली जाते, असे अनेक गंभीर प्रकार १३ नोव्हेंबर रोजी झालेल्या कारवाईत निदर्शनास आले. त्यानंतर आता जिम, केमिस्ट आणि सोशल मीडिया इन्फ्लुएंसर्सना नियमावली लागू केली असून, या नियमांचे पालन करावे लागणार आहे. नियमांचे पालन न करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई केली जाईल. ही नियमावली सर्व घटकांना बंधनकारक असणार आहे, असे एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले. ही नियमावली उत्पादक (निर्माते), पुरवठादार, वितरक, आयातदार, औषधालये (केमिस्ट), जिम आणि हेल्थ सेंटर्स या सर्वांना ही नियमावली लागू असेल.

राज्यावरील दुष्काळाचे सावट दूर होऊ दे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे । कार्तिक एकादशीनिमित्त पंढरपुरात महापुजा

● **पंढरपूर । वीरभूमी–**

राज्यातील दुष्काळी परिस्थिती दूर होऊन बळीराजा आणि सर्वसामान्य जनतेच्या जीवनात सुख, समृद्धी व समाधान नांदू दे, असे साकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले.

कार्तिकी यात्रा २०२६ निमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आयोजित शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मानाचे वारकरी सुधाकर दशरथ शिंदे यांच्या हस्ते सपत्नीक संपन्न झाली. यानंतर मंदिर समितीच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात उपमुख्यमंत्री शिंदे बोलत होते. यावेळी फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार श्रीकांत शिंदे, खासदार संजय जाधव, आमदार अभिजित पाटील, बापूसाहेब पठारे, राजू खरे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, समिती सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.सरकारी माहिती

राज्यातील ३१० तालुक्यांत दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली. खरीप व



रबी हंगामातील पाऊस अत्यंत कमी झाल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले असून, शेतीपिकांचे नुकसान झाले आहे. अशा संकटाच्या काळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. दुष्काळी परिस्थिती दूर होऊन चांगला पाऊस पडावा, बळीराजावरील संकट दूर व्हावे आणि त्याच्या जीवनात सुख-समाधानाचे दिवस यावेत, असे साकडे पांडुरंगाला घातल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व त्यांच्या पत्नी लता एकनाथ शिंदे तसेच मानाचे वारकरी सुधाकर दशरथ शिंदे व त्यांच्या पत्नी प्रणिता सुधाकर शिंदे यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते मानाचे वारकरी शिंदे दाम्पत्याचा श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती व वस्त्र देऊन सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळातर्फे देण्यात येणारा एक वर्षाचा मोफत प्रवास पास त्यांना प्रदान करण्यात आला. मंदिर समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री शिंदे यांचाही सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी केले तर आभार कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी मानले.

आषाढी व कार्तिकी यात्रेदरम्यान वारकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये दरवर्षी सुधारणा करण्यात येत आहेत. वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याकरिता शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जात आहे. दर्शन मंडपासाठी आवश्यक असलेला अतिरिक्त २५ कोटी रुपयांचा निधी पर्यटन विभागामार्फत तत्काळ उपलब्ध करून देण्यात आला. पंढरपूर कॉरिडॉरचे काम सर्व संबंधितांना विश्वासात घेऊनच करण्यात येणार असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले.

बीडमध्ये बनावट पदनिर्मिती उघड, ७३ शिक्षकांची सेवा समाप्त

२ हजार २१७ शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार!

● **बीड । वीरभूमी–**

बीडमध्ये कथित बोगस भरतीतून नियुक्ती मिळविलेल्या ७३ शिक्षकांची थेट सेवा समाप्त करण्यात आली. यात प्राथमिक विभागातील ७ तर माध्यमिक विभागातील ६६ शिक्षकांचा समावेश आहे. बोगस शिक्षक भरती प्रकरणात शिक्षण विभागाने हा मोठा दणका दिला. या कारवाईमुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली. विशेष म्हणजे हा कारवाईचा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. बनावट पदांची निर्मिती करून नियुक्ती मिळवलेल्या आणखी २,२१७ शिक्षकांवर कारवाईची टांगती तलवार असल्याचा दावा तक्रारदार सादेक इनामदार यांनी केला.



राज्यात २०१२ पासून शिक्षक भरती बंद असतानाही शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्याचा आरोप आहे. न्यायालयाच्या सूचनांचा सोयीस्कर अर्थ लावून या नियुक्त्या दिल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. काही ठिकाणी संच मान्यतेत दुरुस्ती करण्याच्या नावाखाली शिक्षकांची पदे वाढविण्यात आली तर काही ठिकाणी बनावट विद्यार्थ्यांची संख्या दाखवून संच मान्यतेतील पदसंख्या वाढविण्यात आल्याचा प्रकार समोर आला.

या संपूर्ण प्रक्रियेत अन्य बनावट कागदपत्रांचाही वापर करण्यात आल्याची माहिती आहे. या कथित गैरव्यवहाराविरोधात बीडमधील सामाजिक कार्यकर्ते सादेक इनामदार यांनी तक्रार केली होती. त्यांनी या प्रकरणाचा एसआयटीकडे पाठपुरावा केला. त्यानंतर शिक्षण विभागाने ७३ शिक्षकांची सेवा समाप्त केल्याची माहिती इनामदार यांनी दिली. दरम्यान, या प्रकरणात बनावट पदांची निर्मिती करून नियुक्ती मिळवलेल्या आणखी २,२१७ शिक्षकांवर कारवाई होऊ शकते, असा दावा सादेक इनामदार यांनी केला. त्यामुळे आतापर्यंत ७३ शिक्षकांवर झालेल्या कारवाईनंतर आता उर्वरित शिक्षकांबाबत शिक्षण विभाग काय निर्णय घेणार, याकडे लक्ष लागले आहे.

यापूर्वीही जानेवारी २०२३ मध्ये बीड जिल्ह्यात बोगस दिव्यांग प्रमाणपत्र काढणा-या ५२ शिक्षकांच्या प्रमाणपत्राची चौकशी केल्यानंतर यामध्ये दोषी आढळलेल्या शिक्षकांवर बीडचे तत्कालीन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार यांनी तात्काळ निलंबनाची कारवाई केली होती.

बदली करण्यासाठी अनेक शिक्षकांनी बोगस दिव्यांग प्रमाणपत्र काढल्याचे उघड झाल्यानंतर २३६ शिक्षकांची अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पुनर्तपासणी करण्यात आली होती. त्यामध्ये ५२ शिक्षकांनी बोगस प्रमाणपत्र तयार केल्याचे उघड झाल्यानंतर त्यांची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करत निलंबनाची कारवाई केली होती.

डीलिमिटेशन विधेयक मंजूरीसाठी खासदारांचा भाव दीडशे कोटींवर!

संजय राऊतांचा भाजपावर खळबळजनक आरोप

● **मुंबई । वीरभूमी–**

केंद्र सरकारला डीलिमिटेशन विधेयक मंजूर करून घ्यायचे असल्याने खासदारांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी मोठ्या प्रमाणात आमदार आणि खासदारांच्या घोडेबाजाराचा भाव आता कोट्यवधींच्या पुढे गेला असून, खासदारांचा दर थेट दीडशे कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचा गंभीर आरोप शिवसेना (ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपावर करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

खासदारांचा भाव शंभर कोटी : केंद्रातील सत्ताधाऱ्यांना डीलिमिटेशन विधेयक मंजूर करून घ्यायचं आहे. त्यासाठी विरोधी पक्षांच्या खासदारांची जुळवाजुळव सुरू असून, त्यांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी कोट्यवधींची आमिषे दाखवली जात असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.



खासदारांच्या या कथित खरेदी-विक्रीचे केंद्र मुंबई बनले आहे काय, असा सवाल करत त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या वारंवार होणा-या महाराष्ट्र आणि मुंबई दौऱ्यांवरही निशाणा साधला. देशाच्या गृहमंत्र्यांना मुंबईत नेमकं काय काम आहे? खासदारांना फोडण्याची जबाबदारी महाराष्ट्रातील आणि मुंबईतील काही प्रमुख नेत्यांवर सोपवण्यात आली आहे काय, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दोन दिवसांपूर्वी खासदारांचा भाव शंभर कोटी रुपये होता. मात्र, आता हा दर थेट दीडशे कोटींवर पोहोचल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. हा किरकोळ व्यवहार नसून देशाच्या राजकारणातील मोठा घोडेबाजार असल्याची टीका त्यांनी केली. सत्तेच्या जोरावर विरोधकांचे संख्याबळ कमी करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या तारखा अद्याप जाहीर न झाल्याच्या मुद्यावरूनही राऊत यांनी केंद्र सरकारला धारेवर धरले. अधिवेशन जाहीर करण्यात एवढा विलंब का होत आहे? खासदारांची जुळवाजुळव आणि कथित आर्थिक व्यवहार पूर्ण करण्यासाठीच सरकार वेळ घेत आहे काय, असा सवाल त्यांनी केला आहे. आगामी अधिवेशनात महाराष्ट्रातील खासदारांनी परिसीमन विधेयकाला पाठिंबा दिला, तर आपण सांगितलेला दीडशे कोटींचा आकडा लक्षात ठेवावा, असा इशाराही त्यांनी दिला.

शेतकरी संघटनेने भेंडा येथे साखरेचा ट्रक अडवला

उसाला ४,५०० रुपये पहिली उचल देण्याची मागणी । साखरेचा दर ६० रुपयांखाली ठेवू नये, संघटनेची भूमिका

● **नेवासा । वीरभूमी–**

उसाला प्रतिटन ४ हजार ५०० रुपये पहिली उचल द्यावी आणि रेव्हेन्यू शेअरिंग फॉर्म्युल्यानुसार रास्त भाव मिळावा, या मागणीसाठी नेवासा तालुका शेतकरी संघटनेने २१ नोव्हेंबर रोजी भेंडा येथे साखरेचा ट्रक अडवला. तालुकाध्यक्ष मेजर अशोक काळे आणि युवा अध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली नेवासा-शेवगाव रस्त्यावरील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या प्रवेशद्वारासमोर हे आंदोलन करण्यात आले. संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ तुवर यांच्यासह कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांच्या सूचनेनुसार राज्यभर साखरेचे ट्रक अडविण्याचे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. पश्चिम महाराष्ट्रात उसाला प्रतिटन ४ हजार रुपयांपर्यंत पहिली उचल मिळत असताना अहिल्यानगर जिल्ह्यात मात्र ३ हजार १०० रुपयांवर शेतकऱ्यांची बोळवण केली जात



असल्याने संघटना आक्रमक झाली आहे. जिल्ह्यातील साखर कारखानदार उसाच्या कमी रिकव्हरीचे कारण देत भाव कमी देत असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

रघुनाथदादा प्रणित शेतकरी संघटनेने ऊस अडविण्याऐवजी साखरेचे ट्रक अडविण्याची भूमिका घेतली आहे. साखरेचा दर प्रतिकिलो ६० रुपयांपेक्षा कमी ठेवू नये, अशी मागणी संघटनेने केली आहे. २०१९ नंतर साखरेच्या किमान आधारभूत किमतीत वाढ झालेली नाही. केंद्र सरकारने निर्धारित केलेला ३१ रुपये प्रतिकिलोचा किमान आधारभूत दर वाढवून ६० रुपये करावा आणि तोपर्यंत कोणत्याही साखर कारखान्याने साखर विक्री करू नये, अशी संघटनेची भूमिका आहे.

सध्याही साखरेचा बाजारभाव प्रतिकिलो ५० रुपयांपेक्षा अधिक असल्याने शेतकऱ्यांना किमान प्रतिटन ४ हजार ५०० रुपये पहिली उचल मिळणे अपेक्षित असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

आंदोलनादरम्यान साखर कारखान्याच्या वतीने उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे, संचालक अशोकराव मिसाळ, दत्तात्रय काळे, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रवींद्र मोटे आणि प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के यांनी आंदोलकांशी चर्चा केली.

या आंदोलनात जिल्हा उपाध्यक्ष हरिभाऊ तुवर, तालुकाध्यक्ष मेजर अशोक काळे, उपाध्यक्ष बाबासाहेब नागोडे, युवा अध्यक्ष डॉ. रोहित कुलकर्णी, ॲड. बाळासाहेब कावळे, दादासाहेब नाबदे, बाबासाहेब खराडे, ताराचंद लोढे, भास्कर तुवर, कृष्णा यादव, बंडोपंत चौगुले, दत्तात्रय निकम, किरण लंघे, संदीप पाखरे आणि शिवसेना महिला आघाडीच्या मीराताई गुंजाळ आदी सहभागी झाले होते.

गोशाळेचा नोंदणी व्यवहार आता कृषिदरानेच होणार

गोशाळेला व्यावसायिक दरातून वगळले

● **मुंबई । वीरभूमी–**

कार्तिकी एकादशीच्या महापर्वावर गोशाळांसाठी फडणवीस सरकारने मोठा निर्णय घेतला. राज्यातील गोशाळेसाठी जमीन खरेदी, दानपत्र, भाडेकरार करताना यापुढे व्यावसायिक दर लावण्यावर सरकारची बंदी असणार आहे. परिणामी गोशाळेसंदर्भातील नोंदणी व्यवहार कृषिदरानेच होणार असल्याची माहिती समोर आली. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या संदर्भात आदेश दिले.शहर शोधा

गोशाळेतून सेवाभाव जपला जातो. भटक्या, आजारी, वृद्ध, अपघातग्रस्त गोवंशाचे संगोपन होते. देशी गोवंशाच्या जतनासह चारा लागवड होत असल्याने गोशाळा व्यावसायिक दरातून वगळण्याचा निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला तर महसूल विभागाने या संदर्भात परिपत्रक जारी केले असून कार्तिकी एकादशीच्या महापर्वावर गोशाळांसाठी फडणवीस सरकारने मोठा निर्णय घेतला आहे.

यासोबतच,गोहत्येलाआळा घालण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे. गोहत्येच्या गंभीर गुन्ह्यांसाठी मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा) लावण्याचा महत्त्वपूर्ण आदेशही सरकारने दिला. राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हे आदेश जारी केले असून, या निर्णयाचे गोशाळा चालकांकडून आणि गोप्रेमींकडून स्वागत केले जात आहे. फडणवीस सरकारच्या या दूरदृष्टीच्या निर्णयामुळे राज्यातील गोशाळांना अधिक प्रभावीपणे कार्य करण्यास मदत मिळेल आणि गोवंश संरक्षणाला बळकटी मिळेल, अशी अपेक्षा आहे.

वीरभूमी

माळकूपमधील ग्रीन एनर्जी कारखान्याच्या प्रदूषणाविरोधात अन्याय निवारण सेवा समिती आक्रमक!

शेतजमीन, जलस्रोत आणि नागरिकांच्या आरोग्याला धोका असल्याचा आरोप; स्वतंत्र त्रयस्थ समितीमार्फत चौकशीची मागणी

● अहिल्यानगर । वीरभूमी –

पारनेर तालुक्यातील माळकूप येथील ग्रीन एनर्जी कारखान्यातून बाहेर पडणारे रासायनिक व सिडयुक्त सांडपाणी परिसरातील शेतजमिनी, जलस्रोत आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरत असल्याची तक्रार अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नाशिक प्रादेशिक कार्यालयाकडे केली आहे. कारखान्यातील सांडपाण्यावर योग्य प्रक्रिया होत नसून, ईटीपी (सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा) प्रभावीपणे कार्यान्वित नसल्याचा आरोप समितीने केला आहे. या प्रकरणाची स्वतंत्र त्रयस्थ समितीमार्फत प्रत्यक्ष तपासणी करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी केली आहे. येत्या १५ दिवसांत कारवाई न झाल्यास नाशिक येथील प्रादेशिक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

समितीने संबंधित अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कारखान्यातून निघणाऱ्या सिडयुक्त मळीची आणि रासायनिक सांडपाण्याची शासनाच्या



नियमांनुसार विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. मात्र, दूषित पाणी शेतजमिनी आणि वनविभागाच्या क्षेत्रात सोडले जात असल्याचा आरोप आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असून जमिनीचा पोत खालावत आहे. भूजलाच्या गुणवत्तेवरही परिणाम होत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे.

रासायनिक सांडपाण्यामुळे जमिनीतील क्षारांचे प्रमाण वाढून सुपीकता कमी होत आहे. परिणामी पिकांच्या उत्पादनावर परिणाम होऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचे समितीचे म्हणणे आहे. बाधित शेतकऱ्यांना शासनाच्या निकषांनुसार नुकसानभरपाई मिळणे अपेक्षित असताना अद्याप योग्य भरपाई देण्यात आलेली नसल्याचेही निवेदनात नमूद केले आहे.

कारखान्यातील सांडपाण्यामुळे परिसरातील विहिरी आणि अन्य जलस्रोत दूषित होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. यामुळे नागरिक आणि पशुधनाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून दुर्गंधी व हवेच्या प्रदूषणाची समस्याही वाढत असल्याचा आरोप आहे. परिसरातील नागरिकांना दमा, रक्तदाब आणि कर्करोगासारख्या गंभीर आजारांचा सामना करावा लागत असल्याचा दावाही समितीने केला आहे. मात्र, या आजारांचा कारखान्यातील प्रदूषणाशी थेट संबंध आहे का, याची वैद्यकीय तपासणीद्वारे पडताळणी होणे आवश्यक आहे.

कारखान्याच्या मालकीच्या जागेतील ३० टक्के क्षेत्रावर नियमानुसार वृक्षलागवड करणे बंधनकारक असतानाही प्रत्यक्षात वृक्षलागवड झालेली नसल्याचा आरोप समितीने केला आहे. तसेच रासायनिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेली ईटीपी यंत्रणाही प्रभावीपणे कार्यरत नसल्याचे निवेदनात म्हटले आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कारखान्याला नोटीस बजावल्यानंतर केवळ तात्पुरत्या उपाययोजना केल्या जातात. तपासणीच्या वेळी त्या दाखविल्या जातात; मात्र त्यानंतर पुन्हा प्रदूषण सुरू होते, असा आरोप समितीने केला आहे. स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी यापूर्वीही अनेकदा तक्रारी व आंदोलने केली; तरी ठोस कारवाई होत नसल्याने नाराजी वाढत असल्याचे रोडे यांनी सांगितले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहिल्यानगर कार्यालयातील उपप्रादेशिक अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवरही समितीने प्रश्न उपस्थित केले आहेत. कारखान्याची प्रत्यक्ष पाहणी करण्याऐवजी केवळ कागदोपत्री तपासणी करून अहवाल तयार केले जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. कारखानदाराला अभय दिले जात असल्याचा संशय व्यक्त करत, स्थानिक कार्यालयाच्या चौकशीवर अवलंबून न राहता विभागीय स्तरावर स्वतंत्र त्रयस्थ अधिकाऱ्यांची समिती नेमण्याची मागणी करण्यात आली आहे.

SPOT NEWS

गुरुवारी केडगाव येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

● अहिल्यानगर । वीरभूमी–

श्री कुंदनलाल तिलकचंद वासन चॅरिटेबल ट्रस्ट व आनंदऋषीजी नेत्रालय यांच्या वतीने गुरुवारी (दि.२६ नोव्हेंबर) रोजी केडगाव एमआयडीसी येथील वासन टोयोटा शोरुम येथे मोफत नेत्र तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दृष्टीदोष असलेल्या गरजूंसाठी मागील १९ वर्षांपासून वासन उद्योग समूहाचे चेअरमन विजयजी वासन यांच्या मार्गदर्शनाखाली गरजूंसाठी या शिबिराचे आयोजन केले जात आहे. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन विजय वासन, तरुण वासन व जनक आहुजा यांनी केले आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन होणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत रुग्णांची तपासणी आनंदऋषीजी नेत्रालय हॉस्पिटलचे तज्ञ डॉक्टर मंडळी करणार आहेत. तर मोतीबिंदू असलेल्या रुग्णांना तपासणीनंतर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. टाक्याचे ऑपरेशन व बिन टाक्याचे (फेको लेसर) ऑपरेशन अल्पदरात केले जाणार आहे. तर शिबीरार्थींना नंबरचे चष्मे कार्यक्रम स्थळी मोफत उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याची माहिती अनिश आहुजा व जालिंदर बोरुडे यांनी दिली. शिबिरार्थींना येताना रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र व आधारकार्डची झेरॉक्स आणने आवश्यक आहे. नांव नोंदणीसाठी जालिंदर बोरुडे ९८८१८१०३३३ व वासन टोयोटा ९६०४०३८२३४ यांच्या नंबरवर संपर्क साधण्याचे सांगण्यात आले आहे.

भाजपचे आमदार अमित गोरखे यांचे अहिल्यानगरमध्ये स्वागत

● अहिल्यानगर । वीरभूमी –

भारतीय जनता पक्षाचे विधान परिषदेचे आमदार तथा युवा नेते अमित गोरखे यांचे अहिल्यानगर शहरात आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी सुभाष वाघमारे यांनी आमदार गोरखे यांचा सत्कार करून त्यांचे स्वागत केले. या भेटीदरम्यान मातंग समाजाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक आणि विकासात्मक प्रश्नांवर त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. याप्रसंगी मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते पंडित सर, वाघमारे, केतकी ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रकाश घोरपडे, युवा उद्योजक प्रदीप वावरे, ज्येष्ठ नेते सुनील उमाप आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना सुभाष वाघमारे म्हणाले की, भारतीय जनता पक्षातील युवा नेतृत्व म्हणून आमदार अमित गोरखे यांच्याकडे आशेने पाहिले जाते. त्यांनी सामाजिक, राजकीय आणि संघटनात्मक क्षेत्रात आपल्या कार्यकर्तृत्वातून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल करण्याची त्यांची भूमिका निश्चितच प्रेरणादायी आहे. युवकांचे प्रश्न, सामाजिक समरसता आणि वंचित घटकांच्या विकासासाठी त्यांचे नेतृत्व महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. दरम्यान, या भेटीत मातंग समाजाच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. समाजातील शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी शहरात आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून प्रश्न सुटत आहे. मात्र आवश्यक असलेल्या उपाययोजना, समाजबांधवांना भेडसावणाऱ्या समस्या तसेच विविध मागण्यांकडे आमदार अमित गोरखे यांचे लक्ष वेधण्यात आले.

प्रभाग क्रमांक १७ मध्ये विकासकामांना गती; सुशांतनगरमध्ये डांबरीकरणाचा शुभारंभ!

● अहिल्यानगर । वीरभूमी –

शहरातील केडगाव परिसरातील प्रभाग क्रमांक १७ मध्ये विविध विकासकामांना गती मिळत असून, सुशांतनगर येथील बरमेचा यांच्या घरापासून ते पळसकर यांच्या घरापर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्यात आले आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या निधीतून तसेच नगरसेविका अश्विनी सुमित लोंढे यांच्या प्रयत्नांतून हे काम पूर्ण झाले. या रस्त्याचा शुभारंभ परिसरातील नागरिकांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नगरसेवक मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, नगरसेविका कमलताई कोतकर, उद्योजक जालिंदर कोतकर, उद्योजक सुमित लोंढे, संचेती साहेब, सुनील नेहुल, माया पळसकर, सुनीता वाघ, सीमा रासने, अजित कोतकर, अनिकेत विधाते, तुषार चौधरी, मनी रासने, सुरेखा धनलगडे, नंदा नेहुल, प्रवीण पळसकर, राजेंद्र वाघ यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नगरसेवक मनोज कोतकर म्हणाले की, प्रभाग क्रमांक १७ मधील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. रस्ते, पाणी, वीज आणि स्वच्छता यांसारख्या प्रश्नांकडे सातत्याने लक्ष देऊन प्रभागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून विकासकामांसाठी निधी उपलब्ध होत असून, सर्व लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या सहकार्याने प्रभागातील प्रलंबित प्रश्न चारी नगरसेव कांच्या माध्यमातून एकत्रितपणे मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. विकासकामे करताना नागरिकांच्या सूचनांनाही प्राधान्य दिले जाईल, असे ते म्हणाले. नगरसेविका अश्विनी सुमित लोंढे म्हणाल्या की, सुशांतनगरमधील या रस्त्याची नागरिकांकडून अनेक दिवसांपासून मागणी होती. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन आमदार जगताप यांच्या निधीतून या रस्त्याचे डांबरीकरण पूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

सद्गुरू श्री शंकर महाराजांचा प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा

दिनदर्शिका व महोत्सव पत्रिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन

● अहिल्यानगर । वीरभूमी–

श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्ट, दत्त कॉलनी, दातरंगे मळा, अहिल्यानगर यांच्या वतीने १७ नोव्हेंबर रोजी सद्गुरू श्री शंकर महाराज यांचा प्रकट दिन भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी विधिवत रुद्राभिषेकाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी १११ दत्तभक्तांनी श्रद्धेने शंकर गीता पारायण केले. त्यानंतर सद्गुरू श्री शंकर महाराज यांच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. भाविकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

या सोहळ्यानिमित्त आगामी दत्त जयंती महोत्सव २०२६ (२४ वे वर्ष) आणि त्याअंतर्गत होणाऱ्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांची माहिती देणाऱ्या महोत्सव पत्रिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सन २०२७ च्या दिनदर्शिकेचेही प्रकाशन झाले. धार्मिक परंपरा जपत सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणण्याचा ट्रस्टचा प्रयत्न या आयोजनातून दिसून आला.

यंदाच्या दत्त जयंती महोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर, सामूहिक हनुमान चालीसा पठण, गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप, ह. भ. प. भोगडे महाराज यांचे प्रवचन, रुद्राभिषेक, होमहवन आणि श्री दत्तप्रभूंची पालखी मिरवणूक आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवात सुमारे पाच ते सहा हजार भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात येणार आहे. धार्मिक कार्यक्रमांसोबत सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत गरजू व्यक्तींना मदतीचा हात देण्याचा संकल्प ट्रस्टने केला आहे.

दत्त जयंती महोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून भक्ती, सेवा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकी जपणारा उपक्रम आहे. लोकसहभागातून साकारत असलेल्या या महोत्सवात भाविकांच्या सहकार्याला विशेष महत्त्व आहे. रक्तदान शिबिर आणि गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप यांसारखे उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यासाठी आर्थिक सहकार्याची आवश्यकता आहे. त्यामुळे दानशूर व्यक्ती, उद्योजक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि दत्तभक्तांनी या कार्यात सहभागी होऊन सढळ हाताने देणगी द्यावी, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

ट्रस्टचे प्रमुख सदस्य दीपक गुंडू यांनीही दत्तभक्तांना उत्सवासाठी आर्थिक सहकार्य करण्याचे आवाहन केले. प्रत्येकाचे क्षमतेनुसार योगदान महोत्सवाच्या आयोजनाला बळ देणारे ठरेल. भक्तांच्या सहकार्याने धार्मिक आणि सामाजिक उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविता येतील, असे त्यांनी सांगितले.

भंडारदरा-निळवंडेच्या आवर्तनाने रब्बी हंगामाला नवी उभारी!

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नियोजनाचा शेतकऱ्यांना दिलासा

● लोणी । वीरभूमी–



भंडारदरा आणि निळवंडे धरणांतून सिंचन व बिगर सिंचनासाठी सोडण्यात आलेल्या आवर्तनाचा लाभ लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना झाला आहे. अपुऱ्या पावसामुळे निर्माण झालेली पाणीटंचाई आणि खरीप हंगामातील नुकसान लक्षात घेऊन जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी रब्बी हंगामासाठी केलेल्या आवर्तनाच्या नियोजनामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून रब्बी पिकांना नवी उभारी मिळाली आहे.

भंडारदरा आणि निळवंडे हे अहिल्यानगर जिल्ह्याच्या शेती व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वाचे जलस्रोत आहेत. या दोन्ही प्रकल्पांमधून संगमनेर, अकोले, राहाता आणि श्रीरामपूर तालुक्यांतील शेतीला सिंचनाचा आधार मिळतो. यंदा लाभक्षेत्रात पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने ग्रामीण भागासह शहरांमध्येही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. पाणीपुरवठा योजनांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी विविध तालुक्यांतून होत होती.

खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने रब्बी हंगाम तरी साधता यावा, या अपेक्षेने शेतकरी आवर्तनाच्या प्रतीक्षेत होते. धरणातून सोडण्यात आलेले पाणी गहू, हरभरा, कांदा, चारा आणि भाजीपाला उत्पादकांसाठी महत्त्वपूर्ण ठरले. निळवंडेच्या डाव्या व उजव्या कालव्यांतून पाणी शेतापर्यंत पोहोचल्याने अनेक शेतकऱ्यांना पिकांना वेळेवर पाणी देता आले.

जलसंपदा विभागाने धरणातील उपलब्ध पाणीसाठा, सिंचनाची गरज आणि लाभक्षेत्रातील मागणी यांचा विचार करून मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी वितरणाचे नियोजन केले. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन आवर्तनाचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले होते.

जलसंपदा विभागाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मंत्री विखे पाटील यांनी जिल्ह्यातील सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती देण्याबरोबरच उपलब्ध पाण्याचा शेतीसाठी प्रभावी वापर करण्यावर भर दिला आहे. सिंचन प्रकल्पांची कार्यक्षमता वाढविणे, कालव्यांची देखभाल, पाणी वितरण व्यवस्था सुधारणे आणि शेतकऱ्यांना वेळेत पाणी उपलब्ध करून देणे यांना प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे पाण्याचा अपव्यय कमी करून आवर्तनाचा लाभ शेवटच्या गावापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न झाला.

या आवर्तनामुळे केवळ शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटला नाही, तर नदीकाठच्या गावांमधील पिण्याच्या पाण्याची टंचाईही तात्पुरती कमी झाली. अकोले, संगमनेर, श्रीरामपूर आणि राहाता तालुक्यांतील बंधारे भरून दिल्याने पाणीपुरवठा योजनांना आधार मिळाला. उपलब्ध पाण्यामुळे चारा पिकांसह रब्बी हंगामातील पिकांना मोठी मदत झाली असून, या नियोजनाबद्दल शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

यापूर्वी उन्हाळी हंगामातही लाभक्षेत्रातील गावांना पाणीटंचाई भासू नये, यासाठी जलसंपदा विभागाने आवर्तनाचे नियोजन केले होते. त्यामुळे पाणी व्यवस्थापनाच्या माध्यमातून शेती आणि पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यास मदत झाली.

रुग्णाचे हृदय उजव्या बाजूला; झडप बदलण्याचे डॉक्टरांसमोर आव्हान!

डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलमध्ये ६० वर्षीय रुग्णावर गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी । CVTS विभागात आतापर्यंत २,३३३ प्रमुख हृदयशस्त्रक्रिया

● अहिल्यानगर । वीरभूमी–

जन्मतःच हृदय छातीच्या उजव्या बाजूला आणि त्यातच हृदयाच्या महत्त्वाच्या झडपेत गंभीर बिघाड, अशा दुर्मीळ परिस्थितीत डॉ. विखे पाटील मेमोरियल हॉस्पिटलच्या हृदयशल्यचिकित्सा विभागाने ६० वर्षीय रुग्णावर मायट्रल झडप बदलण्याची गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या केली. हृदयाच्या असामान्य रचनेचा सखोल अभ्यास करून डॉक्टरांनी हे आव्हान पेलले. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती सुधारल्याने त्याला रुग्णालयातून घरी सोडण्यात आले.

काही महिन्यांपासून रुग्णाला श्वास घेण्यास त्रास, सतत थकवा आणि खोकल्याचा त्रास होत होता. तपासणीत मायट्रल झडपेचा गंभीर विकार आढळला. विशेष म्हणजे, रुग्णाला जन्मजात डेक्स्ट्रोकार्डिया ही अवस्था असल्याने त्याचे हृदय नेहमीच्या डाव्या बाजूऐवजी छातीच्या उजव्या बाजूला होते. त्यामुळे हृदयाची दिशा, अंतर्गत रचना आणि रक्तवाहिन्यांची स्थिती लक्षात घेऊन शस्त्रक्रियेचे नियोजन करणे आवश्यक होते.

हृदयशस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. विनोद चिंदे यांच्या नेतृत्वाखाली विकारग्रस्त मायट्रल झडप काढून तिच्या जागी कृत्रिम झडप बसविण्यात आली. भूलतज्ज्ञ डॉ. राहुल मामडे, डॉ. हर्षल वाळुंज आणि डॉ. केदार देशमुख यांनी शस्त्रक्रियेत सहभाग घेतला.



रुग्णालयाच्या कार्डिओव्हॅस्क्युलर अँड थोरॅसिक सर्जरी विभागाने २०१६ ते सप्टेंबर २०२६ या दशकभराच्या कालावधीत २,३३३ प्रमुख हृदयशस्त्रक्रिया केल्या आहेत. तसेच डायलिसिस रुग्णांसाठी २,१६३ एव्ही फिस्टुला प्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

विभागात बायपास शस्त्रक्रिया, हृदयाच्या झडपा बदलणे व दुरुस्त करणे, जन्मजात हृदयदोषांवरील ASD/VSD शस्त्रक्रिया, रक्तवाहिन्यांच्या फुगवट्यावरील शस्त्रक्रिया आणि डायलिसिससाठी रक्तवाहिन्यांचा मार्ग तयार करण्याच्या सुविधा उपलब्ध आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत २०१४ ते जुलै २०२६ या कालावधीत रुग्णालयाच्या नोंदीनुसार १,४३,९९३ लाभार्थ्यांना उपचारांचा लाभ मिळाला आहे. २०१४ मध्ये १५३ असलेली वार्षिक लाभार्थी संख्या २०२५ मध्ये २०,६०१ वर पोहोचली. शासकीय आरोग्य योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल रुग्णालयाला २०१८ पासून दरवर्षी जिल्हाधिकारी कार्यालय आणि राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले आहे.

रुग्णालयाच्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यांतील रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येतात. हृदयविकार, कर्करोग आणि अन्य गंभीर आजारांवरील विशेष उपचारांमुळे ग्रामीण व निमशहरी भागांतील रुग्णांनाही अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध होत आहेत.

नामदार डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, अध्यक्ष, डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाऊंडेशन यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या पुढाकाराने रुग्णालयातील आधुनिक वैद्यकीय सुविधांचा विकास केला जात आहे. सुपर स्पेशालिटी विभागांच्या माध्यमातून तज्ज्ञांच्या देखरेखीखाली गुणवत्तापूर्ण उपचार उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची ८८ वर्षाची यशस्वी वाटचाल

२२ नोव्हेंबर १९३८ रोजी तत्कालीन पोदार मिल कंपनीने दिलेल्या जागेत मुंबईतील डिलाईल रोड (ना.म.जोशी मार्ग) येथे देशातील पहिल्या कामगार कल्याण केंद्राची स्थापना झाली. तिथून सुरू झालेला हा प्रवास आज ८८ वर्षांनंतरही अविरतपणे सुरू असून, हे मंडळ राज्यातील लाखो कामगार आणि त्यांच्या कुटुंबांसाठी एक भक्कम आधारवड ठरले आहे.

मुंबई कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ नुसार १ जुलै १९५३ रोजी या मंडळाला वैधानिक स्वरूप मिळाले आणि पुढे १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर याचे नाव 'महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ' (MLWB) असे करण्यात आले.

या ऐतिहासिक व यशस्वी वाटचालीचे प्रमुख टप्पे आणि वैशिष्ट्ये म्हणजे...

१) कामगार कल्याणाचा पाया आणि विस्तार : ऐतिहासिक सुरुवात : सन १९३८ मध्ये कामगारांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी अवघ्या एका केंद्रापासून या उपक्रमाची सुरुवात झाली.

त्रिपक्षीय रचना : मंडळाचे कामकाज सरकार, मालक (नियोक्ता) आणि कामगार यांच्या त्रिपक्षीय अंशदानातून (Contribution) चालते, ज्यामुळे कामगारांच्या हक्कांचे आणि हिताचे रक्षण अत्यंत पारदर्शक पद्धतीने होते.

भव्य जाळे : आज राज्यातील हजारो कारखाने, औद्योगिक व व्यापारी आस्थापना, बँका आणि त्यातील ५० लाखांपेक्षा जास्त कामगार व कर्मचारी या मंडळाशी जोडले गेले आहेत.

२) शैक्षणिक क्रांती आणि शिष्यवृत्ती योजना : मंडळाने कामगारांच्या पाल्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी योजना राबवल्या आहेत.

उच्च शिक्षण व परदेशी शिष्यवृत्ती : कामगारांच्या गुणवंत मुलांना परदेशात उच्च शिक्षणासाठी प्रतिवर्ष ५० हजार रुपयांपर्यंतची मदत दिली जाते.

स्पर्धा परीक्षा सहाय्य : UPSC आणि MPSC सारख्या कठीण परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना विशेष शिष्यवृत्ती (UPSC साठी ८,००० रुपये देऊन प्रोत्साहन दिले जाते.

संगणक व कौशल्य विकास : आधुनिक काळाची गरज ओळखून MS-CIT आणि GCC-TBC सारख्या व्यावसायिक कोर्ससाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

पाठ्यपुस्तक सहाय्य : कामगारांच्या मुलांना मोफत किंवा सवलतीच्या दरात पाठ्यपुस्तके खरेदीसाठी अर्थसहाय्य केले जाते.



३) आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा : कामगार आणि त्यांच्या कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी मंडळाने नेहमीच तत्परता दाखवली आहे.

गंभीर आजार उपचार निधी : कर्करोग, हृदयरोग किंवा किडनीचे आजार यांसारख्या गंभीर आजारांच्या उपचारासाठी मंडळाकडून ५,००० ते २५,००० पर्यंतची थेट वैद्यकीय मदत दिली जाते.

महिला सक्षमीकरण : कामगार महिला व कामगारांच्या पत्नींना स्वावलंबी बनवण्यासाठी शिलाई मशीन अनुदान योजना चालवली जाते.

वीरभूमी
सुखदेव एकनाथ फुलारी
कामगार संचालक : लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना



४) क्रीडा, संस्कृती आणि कला गुणांना वाव : शिस्त, सेवा, सुधार, समृद्धी हे ब्रीदवाक्य घेऊन चालणाऱ्या या मंडळाने कामगारांच्या अंगभूत कलागुणांना नेहमीच व्यासपीठ दिले आहे.

नाट्य आणि भजनी स्पर्धा : राज्यस्तरीय भजनी स्पर्धा, लोकनृत्य स्पर्धा, आणि कामगार नाट्य स्पर्धांच्या माध्यमातून औद्योगिक जगतात सांस्कृतिक चैतन्य टिकवून ठेवण्याचे काम मंडळाने केले आहे.

क्रीडा शिष्यवृत्ती : खेळाडू पाल्यांना क्रीडा क्षेत्रात पुढे जाण्यासाठी विशेष क्रीडा शिष्यवृत्ती दिली जाते.

५) कामगार सन्मान (पुरस्कार) : कामगार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या आणि कारखान्यांमध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या कामगारांचा सन्मान करण्यासाठी मंडळातर्फे दरवर्षी गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार, कामगार भूषण पुरस्कार, नारायण मेघाजी लोखंडे पुरस्कार हे प्रतिष्ठित पुरस्कार दिले जातात.

६) आधुनिकतेची कास, डिजिटल कामगार कल्याण : ८८ वर्षांच्या या दीर्घ प्रवासात मंडळाने काळाची पावले ओळखून स्वतःमध्ये अमूलाग्र बदल केले आहेत. आज मंडळाचे संपूर्ण कामकाज डिजिटल व ऑनलाईन झाले आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या अधिकृत पोर्टल (MLWB) द्वारे आता आस्थापना नोंदणी, अंशदान भरणे आणि विविध कल्याणकारी योजनांचे अर्ज थेट ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येत होते. परंतु आता महाराष्ट्र शासनाच्या 'जीपीआर' प्रणाली अंतर्गत महामंडळाचे संपूर्ण कामकाज महाडीबीटी/आपले सरकार/मैत्री इत्यादी पोर्टलवर घेण्यात आले आहे.

गेल्या ८८ वर्षांत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने केवळ कल्याणकारी योजना राबवल्या नाहीत, तर महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या कष्टकरी कामगाराला समाजात प्रतिष्ठेचे स्थान मिळवून दिले आहे. ही ८८ वर्षांची वाटचाल म्हणजे श्रमिकांच्या कल्याणाचा आणि महाराष्ट्राच्या समृद्धीचा एक सुवर्णकाळ आहे.

महाराष्ट्र राज्याचे कामगार मंत्री अड.आकाश फुंडकर, राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, अतिरिक्त मुख्य सचिव आय. ए. कुंदन (आयएस) व कामगार तथा कामगार कल्याण मंडळाच्या उपसचिव रोशनी कदम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ हे राज्यातील २ लाख ७५ हजार आस्थापनांमधील कामगारांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या कल्याणासाठी कार्यरत आहे. राज्यात एकूण २०८ कामगार कल्याण केंद्र कार्यरत आहेत.

– नंदलाल राठोड, कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, मुंबई

SPOT NEWS

मढी येथे रविवारी जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन

● अहिल्यानगर । वीरभूमी–

अहिल्यानगर जिल्हा थलेटिक्स असोसिएशन, अहिल्यानगर आणि शिवछत्रपती करिअर अकॅडमी पाथर्डी (भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा रविवार, दिनांक ६ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ८:३० वाजता श्री क्षेत्र मढी येथे (मढी–पाथर्डी रोड) पार पडणार आहे. या स्पर्धेतून आगामी राज्य क्रॉस कंट्री स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याचा संघ निवडण्यात येणार आहे. पुढील राज्यस्तरीय क्रॉस कंट्री स्पर्धा दिनांक २५ व २६ डिसेंबर २०२६ रोजी उमरगा (जि. धाराशिव) येथे होणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेतील प्रत्येक गटातील प्रथम तीन क्रमांकाच्या विजेत्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरविण्यात येणार आहे. ही स्पर्धा केवळ अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंसाठीच मर्यादित असून १४ वर्षांखालील खेळाडूंना यात सहभागी होता येणार नाही. खेळाडूंची नाव नोंदणी स्पर्धेच्या ठिकाणी सकाळी ८:०० वाजता केली जाणार आहे. सर्व खेळाडूंनी आपला मूळ (ओरिजनल) जन्म दाखला व आधार कार्ड सोबत आणणे बंधनकारक आहे. तसेच, राज्य स्पर्धेत खेळण्यासाठी प्रत्येक खेळाडूने आपला "AFI UID नंबर' काढणे आवश्यक आहे. स्पर्धे संदर्भात काही तक्रार असल्यास इव्हेंट संपल्यानंतर एक तासाच्या आत योग्य त्या पुराव्यासह स्पर्धा आयोजकांकडे अर्ज करावा, त्यावर आयोजन समिती अंतिम निर्णय देईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन अहिल्यानगर जिल्हा थलेटिक्स असोसिएशनचे अध्यक्ष सुनील जाधव व उपाध्यक्ष राजेंद्र कोतकर यांनी केले आहे.

निमगाव वाघाच्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ॲड. राजेश कावरे

● अहिल्यानगर । वीरभूमी–

ग्रामीण भागातील साहित्यिक, कवी, लेखक आणि नवोदित प्रतिभावंतांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देण्यासाठी नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथील परिवार मंगल कार्यालयात मंगळवार, दि. २४ नोव्हेंबर रोजी नवव्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने हे संमेलन पार पडणार आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. राजेश कावरे यांची निवड करण्यात आली आहे. संमेलनासाठी लेखक, नाशिक येथील चित्रपट निर्माता व दिग्दर्शक सुनील मोंढे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख व प्रेरक वक्ते आणि सामाजिक कार्यकर्ते अमोद नलगे यांचीही विशेष उपस्थिती लाभणार आहे. संमेलनाच्या माध्यमातून ग्रामीण साहित्य, सामाजिक जाणीव, सांस्कृतिक परंपरा आणि नव्या पिढीतील साहित्यिकांच्या अभिव्यक्तीला प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. अशी माहिती संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे यांनी दिली. ग्रामीण भागात अनेक प्रतिभावंत लेखक, कवी आणि साहित्यिक आपल्या लेखणीच्या माध्यमातून समाजातील वास्तव, प्रश्न, संघर्ष, ग्रामीण संस्कृती आणि मानवी संवेदनांचे दर्शन घडवत असतात. मात्र, त्यांना आपले साहित्य सादर करण्यासाठी आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी पुरेशी व्यासपीठे उपलब्ध होत नाहीत. ही उणीव भरून काढण्याबरोबरच ग्रामीण भागातील साहित्यिक चळवळीला व्यापक स्वरूप देण्याच्या हेतूने या संमेलनाची परंपरा जपली जात आहे.

चंद्रभागा ठाणगे यांचे निधन

● पारनेर । वीरभूमी–



तालुक्यातील करंदी येथील जुन्या पिढीतील आदर्श माता चंद्रभागा मंजाबा ठाणगे यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले आहे. निधन समयी वय ८० वर्षाचे होते. त्यांच्या पाठीमागे एक मुलगा, दोन मुली, नातू असा मोठा परिवार असून जिल्हा फेडरेशनचे माजी अध्यक्ष संभाजी गायकवाड यांच्या बहिण हत्तरखिंडीचे सरपंच महेंद्र गायकवाड यांच्या आत्या तर मळगंगा देवस्थानचे अध्यक्ष लखन ठाणगे यांच्या त्या आजी होत.

शेतीला विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे काळाची गरज

आ. आशुतोष काळे । कर्मवीर कृषी महोत्सव २०२६ चे मोठ्या उत्साहात उद्घाटन संपन्न

● कोपरगाव । वीरभूमी–



चालू वर्षी दुष्काळामुळे पाण्याची टंचाई जाणवणार असून पुढील सहा ते आठ महिने कसे जातील याची चिंता भेडसावत आहे. त्यामुळे निश्चितच शेतकऱ्यांच्या अडचणी वाढणार आहेत. अशा परिस्थितीत या अडचणी दूर करण्यासाठी कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्यासाठी शेतीला विज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे काळाची गरज आहे. हि गरज कर्मवीर कृषी महोत्सवाच्या माध्यमातून पूर्ण होणार असल्याचे प्रतिपादन आमदार आशुतोष काळे यांनी केले.

माजी खासदार कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांच्या १४ व्या पुण्यस्मरणानिमित्त कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कोळपेवाडी येथे गौतम पब्लिक स्कूलच्या प्रशस्त मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या कर्मवीर कृषी महोत्सव २०२६ चे उद्घाटन माजी आमदार अशोकराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली, राज्याचे माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड यांच्या हस्ते व आमदार आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले यावेळी ते बोलत होते.

तत्पूर्वी माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी दिलखुलासपणे संवाद साधतांना सांगितले की, शासनाच्या सेवेत असतांना शेतकरी आणि साखर कारखानदारीच्या बाबतीत घेतलेल्या अनेक निर्णयामुळे शेतकरी आणि साखर कारखाना दोघांचाही फायदा झाला. शेती झपाट्याने बदलत असून पुढील पिढी शेती करेल का? प्रश्न मनाला पडत असला तरी भविष्यात शेतीला चांगले दिवस येणार आहे. शेती संशोधनाचा वेग कमी असून दुर्दैवाने छोट्या शेतकऱ्यांच्या गरजेनुसार संशोधन होत नाही. तरी देखील शेतकऱ्यांनी उपलब्ध नवतंत्रज्ञानाचा शेतीत प्रयोग करून कष्ट कसे कमी होतील याचा प्रयत्न करावा.प्रीसिजन फार्मिंगचा मोठ्या प्रमाणावर उपयोग आपल्या राज्यात आणि देशात व्हायला हवा. पाण्याचा एक एक थेंब अतिशय महत्वाचा असल्याने पाणी जपून वापरावे. परदेशात अतिशय आधुनिक पद्धतीने शेती केली जाते. परदेशात एआय तंत्रज्ञान, आधुनिक मशिनरी आणि सूक्ष्म नियोजन केल्यामुळे शेतकऱ्यांचे आयुष्य अतिशय सोप झालेलं असून कर्मवीर कृषी महोत्सवासारख्या उपक्रमातून शेतकऱ्यांना या आधुनिक तंत्रज्ञानाची सखोल ओळख होणार असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

प्रशासकीय सेवेत असतांना ग्रामीण भागात शेतीच्या बांधावरून आणि जमिनीच्या वाटणीवरून होणारे वाद मोठ्या प्रमाणावर असल्याचे मी अनुभवले आहे. अनेकदा काही फुटांच्या जमिनीवरून शेतकरी वर्षानुवर्षे न्यायालयात लढत राहतात. अनेकदा वादाचा निकाल लागेपर्यंत पिढी बदलते, पण प्रश्न तसाच कायम राहतो. यात शेतकऱ्यांचा पैसा, वेळ आणि मानसिक स्वास्थ्य खर्ची पडते, तर कुटुंबातील नातेसंबंधही दुरावतात. त्यामुळे असे वाद कोर्ट-कचेरीत नेण्यापेक्षा आपापसात सामंजस्याने सोडविणे गरजेचे आहे. जमिनीच्या बांधावरून वाद वाढविण्यापेक्षा माणसांमधील नात्यांचे बांध टिकवणे अधिक महत्त्वाचे असल्याचे माजी साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी सांगितले.

आमदार आशुतोष काळे म्हणाले की,कर्मवीर शंकररावजी काळे यांनी शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामीण भागाच्या आर्थिक उन्नतीसाठी संपूर्ण आयुष्य वेचले. सहकार, शेती, शिक्षण आणि सामाजिक विकासाचा समन्वय साधून ग्रामीण प्रगतीचा पाया रचला. त्यांनी त्या काळातही शेतकऱ्यांना देश-विदेशातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती, शेतीपूरक उद्योग व्यवसाय यांची माहिती व्हावी यासाठी कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीची दिशा दाखविली.त्यांच्या पुण्यस्मरणानिमित्त कृषी महोत्सवाचे आयोजन ही त्यांच्या विचारांना आणि कार्याला वाहिलेली खरी आदरांजली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन दिनार कुदळे, सर्व संचालक मंडळ, कर्मवीर शंकरराव काळे मित्रमंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवन, उपाध्यक्ष नारायणराव मांजरे, जिल्हा कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, सर्व संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक, अधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी मोफत सर्वरोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

अनावश्यक खर्चाला फाटा देत आध्यात्मिक सेंटरमध्ये बालकाचा पहिला वाढदिवस साजरा

● पारनेर । वीरभूमी–



आजच्या काळात वाढदिवस म्हटले की मोठा खर्च, आकर्षक सजावट, केक, रोषणाई आणि धूमधडाका असे चित्र पाहायला मिळते. मात्र या सर्व गोष्टींना फाटा देत सामाजिक भान आणि आध्यात्मिक संस्कारांची जपणूक करण्याचा आदर्श पारनेर शहरातील नरसाळे कुटुंबीयांनी समाजासमोर ठेवला आहे.

पारनेर शहरातील यशराज अमोल नरसाळे या बालकाचा पहिला वाढदिवस सध्या राज्यात जाणवत असलेल्या दुष्काळी परिस्थितीचे भान ठेवून अत्यंत साध्या आणि आध्यात्मिक वातावरणात साजरा करण्यात आला. ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटर येथे हा वाढदिवस उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च करण्याऐवजी आध्यात्मिक वातावरणात आनंदाचे क्षण साजरे करण्याचा निर्णय नरसाळे कुटुंबीयांनी घेतला. या उपक्रमातून समाजाला साधेपणा, सामाजिक संवेदनशीलता आणि आध्यात्मिक जीवनमूल्यांचा महत्त्वपूर्ण संदेश देण्यात आला.

यावेळी ईश्वरीय विश्व विद्यालय पारनेर सेंटरच्या संचालिका ब्रह्माकुमारी साधना दीदी, मीरा पुजारी, पत्रकार भगवान गायकवाड, अजिनाथ ढेरे, अमोल नरसाळे, विशाल गोरडे, सिंधू गाडगे, मयुरी गाडगे, माधुरी नरसाळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बालकाला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. बालपणापासूनच मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, त्यांना प्रेम, शांती, समाधान, नम्रता आणि परोपकार यांसारख्या मूल्यांची ओळख व्हावी, यासाठी अशा आध्यात्मिक वातावरणातील उपक्रमांचे विशेष महत्त्व असल्याचे यावेळी अधोरेखित झाले. वाढदिवस हा केवळ आनंदोत्सव नसून जीवनात चांगल्या विचारांची आणि संस्कारांची पेरणी करण्याची संधी आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. दुष्काळी परिस्थितीत गरज नसलेल्या खर्चाला आळा घालून साधेपणाने आनंद साजरा करण्याचा नरसाळे कुटुंबीयांचा हा उपक्रम निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी ठरणारा आहे.

जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाचे पहिल्या महिन्याचे मानधन 'स्नेहालय'ला!

डॉ. सुजय विखे पाटील यांचा निर्णय । दरमहा वेगवेगळ्या सेवाभावी संस्थांना मानधन देणार

● अहिल्यानगर । वीरभूमी–



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर मिळणारे पहिल्या महिन्याचे संपूर्ण मानधन डॉ. सुजय विखे पाटील यांनी सामाजिक कार्यासाठी देण्याचा निर्णय घेतला आहे. हे मानधन त्यांनी अहिल्यानगरमधील 'स्नेहालय' या सामाजिक संस्थेला देण्याचे ठरविले असून, यापुढेही दर महिन्याला मिळणारे मानधन वेगवेगळ्या सामाजिक संस्थांना देण्याचा संकल्प त्यांनी केला आहे.

अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर डॉ. विखे पाटील यांनी घेतलेल्या या निर्णयाची चर्चा होत आहे. सार्वजनिक पदावर काम करताना मिळणाऱ्या मानधनाचा उपयोग समाजातील गरजू घटकांसाठी व्हावा, अशी त्यामागील भूमिका आहे. त्यानुसार पहिल्या महिन्याच्या मानधनासाठी त्यांनी स्नेहालय संस्थेची निवड केली.

स्नेहालय संस्था गेल्या अनेक वर्षांपासून समाजातील वंचित, निराधार आणि गरजू घटकांसाठी कार्यरत आहे. अशा सामाजिक संस्थांच्या उपक्रमांना आर्थिक बळ मिळावे, या उद्देशाने डॉ. विखे पाटील यांनी आपले मानधन संस्थेला देण्याचे ठरविले आहे.

हा उपक्रम केवळ पहिल्या महिन्यापुरता मर्यादित नसून, अध्यक्षपदाच्या कार्यकाळात दर महिन्याला मिळणारे मानधन जिल्ह्यातील वेगवेगळ्या सामाजिक व सेवाभावी संस्थांना देण्यात येणार आहे. त्यामुळे विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या संस्थांना आर्थिक मदत मिळण्यास हातभार लागणार आहे.

जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी आणि सहकार क्षेत्रातील प्रश्नांवर काम करतानाच सामाजिक संस्थांच्या कार्यालाही मदत करण्याची भूमिका डॉ. विखे पाटील यांनी घेतली आहे. पहिल्या महिन्याचे मानधन स्नेहालयला देऊन सुरू केलेला हा उपक्रम पुढील काळात जिल्ह्यातील विविध सेवाभावी संस्थांना आर्थिक आधार देणारा ठरणार आहे.

गाड्या-घोड्या, मठ आणि सेवकांचा गराडा म्हणजे साधुत्व नव्हे!

धर्माच्या नावाखालील अवडंबराला माधव बाबांचा परखड विरोध । त्याग, साधना आणि सेवेतच खऱ्या धर्माची अनुभूती

● पाथर्डी । वीरभूमी–



धार्मिकतेपेक्षा तिचे अवडंबर करून केवळ प्रतिष्ठेसाठी धर्माचरण करणाऱ्या व्यक्तीला कोणतेही आध्यात्मिक फळ मिळत नाही. उलट धर्मविचारांची बदनामी केल्याचा दोष लागतो. इतर क्षेत्रांप्रमाणे धार्मिक क्षेत्रातही भोंदू साधकांमुळे धर्म बदनाम होत आहे. त्याग, साधना, सेवा, दान आणि तीर्थयात्रांच्या माध्यमातूनच धर्माची खरी अनुभूती मिळते, असे परखड मत शंकर महाराज मठाचे संस्थापक माधव बाबा यांनी व्यक्त केले.

शंकर महाराज यांच्या प्रकट दिनानिमित्त आयोजित धर्मविचार कार्यक्रमात ते बोलत होते. राज्याच्या विविध भागांतून मोठ्या संख्येने भाविक पहाटेपासूनच मठात दाखल झाले होते. शहरातील ज्येष्ठ व्यापारी किरण काजळे यांच्या हस्ते महापूजा करण्यात आली. त्यांच्या वतीने भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, तालुका संघाच्या संचालिका सिंधूताई साठे आदी मान्यवरांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मठातून पालखीने खोलेश्वर मंदिराकडे प्रस्थान केले. ग्रामदैवत खोलेश्वर मंदिरात पूजा-अर्चा झाल्यानंतर पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली. वाद्यांच्या गजरात ग्रामप्रदक्षिणा पूर्ण करून पालखी पुन्हा मठात दाखल झाली. दुपारी महाआरती झाली.

यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, नगरसेवक दीपाली बंग, मंगल सोनटक्के, सुभाष बोरुडे, मनीषा उदमले, स्वामी समर्थ विद्यालयाचे संस्थापक दिलीप भांडकर, स्वामी नित्यानंद महाराज, शशिकांत सोनवणे महाराज यांच्यासह अहिल्यानगर, पुणे, राहुरी, बीड, छत्रपती संभाजीनगर, नाशिक आणि श्रीरामपूर परिसरातील मान्यवर व साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माधव बाबा म्हणाले, धर्माचरण अत्यंत सोपे असून ते जीवनाच्या सर्वांगीण कल्याणासाठी आहे. साधी, सरळ आणि परोपकारी जीवनशैली स्वीकारणारी तसेच परनिंदा टाळणारी व्यक्तीच खऱ्या अर्थाने धर्म समजून घेते. लोकांचे पैसे बुडवू नका, व्यसनांपासून दूर राहा, उत्पन्नाच्या मर्यादेत खर्च करा. वैयक्तिक गरजा भागवून सन्मार्गाने मिळवलेल्या उत्पन्नातील काही वाटा धर्मकार्यासाठी राखून ठेवा.

वाममार्गाने मिळवलेली संपत्ती रोगराई, अहंकार, शत्रुपीडा, व्यसनाधीनता, अपयश आणि वंशच्छेदाला कारणीभूत ठरते. अशा संपत्तीतून केलेले देवधर्माचे कार्य ईश्वरालाही मान्य नसते. ईश्वरावर निस्सीम श्रद्धा, मनात सेवाभाव आणि ईश्वराशी एकरूप झाल्याची भावना व्यक्तीला बाह्य जगाच्या मोहापासून अलिप्त ठेवते. अहंकारी, दुराचारी आणि स्वैराचारी व्यक्तीने कितीही दिखाऊ धर्माचरण केले, तरी समाज अशा व्यक्तीला स्वीकारत नाही. समाजमान्यता असलेल्या व्यक्तीलाच ईश्वराचा आशीर्वाद लाभतो. समाज हाच ईश्वर असून संत हे कल्याणाचे शाश्वत साधन आहेत.

अवतारी महात्मे सर्वसामान्यांच्या उद्धारासाठी अवतार घेतात. लौकिक अर्थाने ते आपल्यात नसले, तरी साधकाने स्मरण करताच प्रकट होण्याचे सामर्थ्य अशा महात्म्यांमध्ये असते. त्यापैकी शंकर महाराज एक आहेत. पाथर्डीवासीयांचे अनेक जन्मांचे भाग्य म्हणून शंकर महाराजांनी स्वप्नदृष्टांत देऊन शाश्वत निवासासाठी पाथर्डी शहराची निवड केली. त्यामागे निश्चितच कल्याणाचा मार्ग आहे. समाधी घेण्यापूर्वीही शंकर महाराजांचे वास्तव्य पाथर्डी तालुक्यात होते. संत-महंतांची ही भूमी साक्षात देवभूमी आहे. शंकर महाराजांच्या सानिध्यात अनेक साधकांनी शाश्वत कल्याणाचा मार्ग शोधला आहे.

केवळ फोटोपुरते देवधर्माचे आचरण करू नका किंवा लोकांसमोर मिरवण्यासाठी मंदिर-मठात वावरू नका. आपले श्रद्धास्थान येथे शाश्वत स्वरूपात विराजमान आहे. त्यामुळे स्वतःचे अस्तित्व विसरून त्यांच्या चरणी लीन होण्यासाठी मंदिर-मठात यावे. धर्मविचार आणि धर्माचरणाची खरी ओळख होण्यासाठी संतविचारांची कास धरूनच पुढे जावे लागेल, असेही त्यांनी सांगितले.

सर्वत्र बुवाबाजी वाढत असल्याने खरा धर्म आणि दांभिक धर्म यातील सीमारेषा धूसर झाली आहे. धर्माच्या नावाखाली भोळ्याभाबड्या जनतेची दिशाभूल होत असून ती विनाशाला कारणीभूत ठरत आहे. दुष्काळ, पूर, साथीचे आजार आणि अपघात ही त्याचीच प्रतीके असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

भाविकांच्या देणगीतून किंवा विविध मार्गांनी जमा केलेल्या संपत्तीतून गाड्या-घोडे घेऊन मिरवणे, मोठमोठे मठ बांधणे आणि तेथेही उत्पन्नानुसार आचरण ठेवणे, याला धर्म म्हणता येणार नाही. सेवा, त्याग आणि समर्पणभावनेतूनच खरे कल्याण साधता येते. हीच शंकर महाराजांची शिकवण आणि ओळख शाश्वत ठरणार आहे, असे माधव बाबा यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, रात्री उशिरापर्यंत विविध गावांतील भाविक मठात दर्शनासाठी येत होते. शंकर महाराजांनी विश्रांतीसाठी वापरलेला लोखंडी पलंग आजही मठात जतन करण्यात आला आहे. उच्च कोटीच्या साधकांनाही शंकर महाराज पाथर्डीच्या मठात दर्शनासाठी येण्याचा दृष्टांत देतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे. यावरून या स्थानाचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित होते.

वीरभूमी
हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर-४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
* संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

सरकारी योजनांचा लाभ केवळ अनुदानापुरता नको; प्रशिक्षणातून रोजगाराच्या संधी निर्माण करा!

डॉ. सुजय विखे पाटील । पुणतांबा येथे नोंदणीकृत बांधकाम कामगारांना कौशल्य प्रशिक्षण प्रमाणपत्रांचे वितरण



● **पुणतांबा । वीरभूमी –**

शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेऊन सर्वसामान्य कुटुंबांनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची गरज आहे. केवळ योजनांमधून मिळणारे अनुदान, साहित्य किंवा आर्थिक मदतीपुरते समाधान न मानता, शासनाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या कौशल्य प्रशिक्षणाचा उपयोग करून रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करा. प्रशिक्षण घेतल्यानंतरही घरी बसून राहू नका. रोजगाराची मागणी करणाऱ्या प्रशिक्षित युवकांना काम मिळवून देण्याची जबाबदारी मी स्वीकारतो, अशी ग्वाही भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष तथा अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली.

पुणतांबा येथे आयोजित महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वतीने आयोजित कौशल्य वृद्धीकरण प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ग्रामीण व शहरी भागातील नोंदणीकृत बांधकाम कामगारांना कौशल्य प्रशिक्षण प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमात ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार केवळ प्रमाणपत्रांचे वाटप करत नाही, तर योजनांचा प्रत्यक्ष लाभ लाभार्थ्यांच्या खात्यापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहे. बांधकाम कामगारांना प्रमाणपत्रांचे ऑनलाइन वितरण पूर्ण झाल्यानंतर संबंधित कामगारांच्या खात्यावर प्रत्येकी चार हजार दोनशे रुपये जमा केले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मात्र, या आर्थिक मदतीबरोबरच कामगारांनी शासनाच्या माध्यमातून मिळणाऱ्या प्रशिक्षणाचा उपयोग करून स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

पुढे बोलताना म्हणाले शिर्डी आणि परिसरात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक तसेच पायाभूत विकासाची कामे सुरू आहेत. एमआयडीसीच्या माध्यमातून उद्योग उभे राहत आहेत. शिर्डीमध्ये सुमारे साडेतीनशे कोटी रुपयांच्या खर्चातून विकासकामे होत असून, जवळपास पन्नास कोटी रुपये खर्चून क्रीडांगणाची उभारणी केली जात आहे. याशिवाय अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, रस्ते आणि अन्य पायाभूत सुविधांची कामे सुरू आहेत. त्यामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. मात्र, या संधींचा लाभ स्थानिक तरुणांनी घेतला पाहिजे.

महिला आणि पुरुषांनीही कुटुंबाच्या आर्थिक जबाबदारीत समान सहभाग घेतला पाहिजे. केवळ महिलांनी घरकाम करावे आणि पुरुषांनीच रोजगारासाठी बाहेर पडावे, अशी मानसिकता बदलण्याची गरज आहे. कुटुंबाच्या प्रगतीसाठी दोघांनीही एकत्रितपणे प्रयत्न केले, तरच तालुक्याचे भविष्य उज्ज्वल होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्य शासनाच्या योजनांचा उल्लेख करताना डॉ. विखे पाटील यांनी मोफत वीज, लाडकी बहीण योजना, दुष्काळी मदत आणि जलसिंचनाच्या कामांचा संदर्भ दिला. राज्यात दुष्काळ जाहीर झाल्यानंतर राहाता तालुक्याचाही त्यामध्ये समावेश करण्यात आला. दिवाळीपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पाच हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात आली. याशिवाय निळवंडे धरणाचे पाणी परिसरात आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले.

महाराष्ट्रातील इतर भागांत दुष्काळाची परिस्थिती असली, तरी राहाता तालुक्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संकल्प केला आणि त्यादृष्टीने काम केले. पाणी, वीज रोजगाराच्या प्रश्नांवर सरकारने केलेल्या कामांचा लाभ जनतेने घेतला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

जात-पात बाजूला ठेवून विकासाच्या मुद्द्यावर एकत्र या तसेच समाजातील जातीय आणि धार्मिक भेदांवर भाष्य करताना डॉ. विखे पाटील यांनी अत्यंत स्पष्ट भूमिका मांडली. दुष्काळ पडतो तेव्हा तो कोणत्याही एका जातीसाठी पडत नाही. समाजातील नागरिक असोत, पाण्याची गरज सर्वांनाच असते. निसर्गाला जात माहीत नसते. त्यामुळे समाजाच्या विकासाचा विचार करताना जात आणि धर्मापेक्षा कौशल्य, गुणवत्ता आणि कर्तृत्वाला महत्त्व मिळाले पाहिजे.

राजकीय मतभेद असू शकतात; मात्र सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर सर्वांनी एकत्र आले पाहिजे. भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना किंवा अन्य कोणत्याही पक्षाचा कार्यकर्ता असला, तरी दुष्काळ आणि सामान्य माणसाच्या अडचणी सर्वांसाठी सारख्याच आहेत. राजकारण कुठपर्यंत करायचे आणि जनहिताच्या प्रश्नांवर कुठे थांबायचे, हे समजून घेण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्रीमंतांनी स्वस्त धान्याचा लाभ सोडून गरिबांना संधी द्यावी स्वस्त धान्य वितरण व्यवस्थेतील गैरप्रकारांवरही त्यांनी लक्ष वेधत आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या आणि चारचाकी वाहने, बंगले असलेल्या कुटुंबांकडूनही स्वस्त धान्याचा लाभ घेतला जात असल्याचे त्यांनी सांगितले. याउलट दुसरीकडे झोपडपट्टीत आणि पत्र्याच्या घरात राहणाऱ्या गरजू कुटुंबांना पुरेसे धान्य मिळत नाही, ही गंभीर बाब असून ज्यांना आर्थिकदृष्ट्या धान्य खरेदी करणे शक्य आहे, अशा कुटुंबांनी स्वतःहून स्वस्त धान्य योजनेचा लाभ सोडून तो खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. आपण स्वतः अशा प्रकारे सुमारे ८० हजार अपात्र लाभार्थ्यांची नावे कमी केली असल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचा विखे पाटील कुटुंबाचा इतिहास शिर्डी नगरपरिषदेचा प्रश्न, निळवंडे धरणाचे पाणी, साई संस्थानच्या कर्मचाऱ्यांचा कायमस्वरूपी सेवेचा प्रश्न आणि परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचा विषय अशा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांचा उल्लेख करत त्यांनी हे प्रश्न प्रत्यक्ष प्रयत्नांतून मार्गी लावल्याचे सांगितले.

केवळ आश्वासनांच्या जोरावर मत मागण्याचे दिवस आता संपले आहेत. जनतेच्या प्रश्नांवर काम करून दाखवावे लागते. गावातील राजकीय वाद आणि मतभेद बाजूला ठेवून गरिबांना घरकुल मिळावे, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत. गावातील एकही गरीब कुटुंब घरापासून वंचित राहू नये, यासाठी पुढील वर्षभरात नियोजन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पुणतांबा गावात अत्याधुनिक शॉपिंग कॉम्प्लेक्स तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या साठी निधी मंजूर झाला असून या जागेची पाहणी ग्रामस्थांच्या उपस्थिती डॉ विखे यांनी केली.

यावेळी पुणतांबा भाजपा महायुतीचे पदाधिकारी तसेच गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पीएमश्री शाळेतील विद्यार्थ्यांनी अनुभवली 'आकाशगंगेची सफर'!

पोलाद स्टीलच्या पुढाकारातून अनोखा दृकश्राव्य उपक्रम; ग्रह, तारे आणि अंतराळाच्या विश्वाने विद्यार्थ्यांमध्ये वाढवले कुतूहल



● **पाथर्डी । वीरभूमी–**

पाथर्डी येथील न्यू सोनल स्टील आणि जालना येथील पोलाद स्टील यांच्या संयुक्त विद्यमाने पीएमश्री जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा (मुले) व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (मुली) येथील विद्यार्थ्यांसाठी 'आकाशगंगेची सफर' हा नाविन्यपूर्ण दृकश्राव्य उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना अंतराळ, ग्रह, तारे आणि खगोलशास्त्राची अनोखी सफर अनुभवता आली.

पोलाद स्टीलच्या सामाजिक व लोककल्याणकारी निधीतून हा उपक्रम मोफत आयोजित करण्यात आला होता. कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक सुशांत गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रसाद जोशी आणि सार्थक डीके यांनी विद्यार्थ्यांना ही अंतराळ सफर घडवली.

यावेळी सोनल स्टीलचे संचालक राजेंद्र भंडारी, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत शेळके, पीएमश्री शाळेच्या मुख्याध्यापिका नंदा तुपे, जिल्हा परिषद प्राथमिक मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक राजू गोल्हार, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा निशा खाटेर, जयश्री काळोखे आदी उपस्थित होते. तसेच शिक्षिका मंदा पालवे, अनुराधा तरवडे, शीला नागरे, छाया चंदनशिव, सुरेखा बडे, मनीषा फटांगरे, भावना देवरे, ज्योती जाधव, कविता शिरसाट, ज्योती भोसले, खाडे मॅडम, भंडारे मॅडम, जायभाय सर, कीर्तने मॅडम यांच्यासह पालक उपस्थित होते.

'क्षितिजाच्या पलीकडचा प्रवास! अंतराळ, ग्रह आणि ताऱ्यांची अद्भुत दुनिया आता अगदी जवळून पहा' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी चंद्र, चांद्रयान, चंद्रावरील वातावरण, तापमान आणि गुरुत्वाकर्षण शक्ती यांची माहिती घेतली. विविध देशांनी वेगवेगळ्या वर्षांत राबवलेल्या चांद्रयान मोहिमा, नील आर्मस्ट्रॉंग यांनी चंद्रावर ठेवलेले पहिले पाऊल, अपोलो यान, डिफेंडर यान आणि भारताच्या चांद्रयान मोहिमेविषयीही विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात उत्साही वातावरणात झाली. पोलाद स्टील कंपनीच्या चमूने उत्कृष्ट नियोजनातून या उपक्रमाचे सादरीकरण केले. चलचित्र आणि दृकश्राव्य माध्यमातून सूर्यमाला, विविध ग्रह, तारे आणि अंतराळातील रहस्ये विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यात आली.

या अनोख्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांच्या अवकाशविषयक आणि खगोलशास्त्राच्या ज्ञानात मोलाची भर पडली. अंतराळातील अद्भुत दृश्ये पाहताना विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसाठी उपयुक्त ठरलेल्या या उपक्रमाबद्दल जिल्हा परिषद शाळा आणि शालेय व्यवस्थापन समितीच्या वतीने पोलाद स्टील कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानण्यात आले. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनाची आवड निर्माण होण्यास मदत होते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

पाडोशीतील रस्त्याच्या प्रश्नावर ग्रामस्थ आक्रमक; प्रशासनाला दहा दिवसांचा अल्टिमेटम!

खडी टाकून तीन वर्षे उलटली, तरी काम रखडले । एसटी सेवा बंद, जीवघेण्या प्रवासातून ग्रामस्थांची सुटका कधी?



● **अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील आढळा परिसरातील पाडोशी येथील रस्त्याच्या दुरवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या तीन वर्षांपासून रस्त्याचे काम रखडले असून, केवळ खडी टाकून काम थांबवण्यात आले आहे. त्यामुळे संतप्त ग्रामस्थांनी प्रशासनाला दहा दिवसांचा अल्टिमेटम देत रस्ता वाहतुकीसाठी सुरू करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

अकोले-म्हैसवळण घाट तसेच समशेरपूर-केळी मार्गे म्हैसवळण घाट या रस्त्यांची अनेक वर्षांपासून दुरवस्था झाली आहे. मोठमोठे खड्डे, उखडलेली खडी आणि चिखलामुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. मुंबई आणि नाशिककडे जाण्यासाठी हा महत्त्वाचा मार्ग असल्याने रस्त्याच्या दुरवस्थेचा फटका परिसरातील नागरिकांना बसत आहे.

अलीकडेच रिलस्टार अश्विनी कुलाळ यांच्या व्हिडिओमुळे या रस्त्याचा प्रश्न चर्चेत आला. त्यानंतर ग्रामस्थांनीही आक्रमक भूमिका घेत प्रशासनाचे लक्ष वेधले. यापूर्वी आम्ही स्वतः खडी फोडून रस्त्याचे काम केले होते; मात्र आजही रस्त्याची अवस्था अत्यंत खराब आहे, असे पांडुरंग कुलाळ यांनी सांगितले.

रस्त्याची अवस्था इतकी बिकट आहे की, गर्भवती महिलेला उपचारासाठी घेऊन जाताना रस्त्यातच प्रसूती होण्याची वेळ येण्याची भीती आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ प्रवासापुरता मर्यादित नसून नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

रस्त्याच्या दुरवस्थेचा फटका एसटी बससेवेलाही बसला आहे. काही वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेली सिन्नर-कसारा बससेवा केळी मार्गे म्हैसवळण घाटावरून धावत होती. मात्र रस्त्याचे काम अपूर्ण राहिल्याने ही सेवा बंद पडली. दोन महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या अकोले-कसारा बससेवेवरही रस्त्याच्या दुरवस्थेचा आणि वाहतुकीतील धोक्याचा परिणाम झाला आहे. परिणामी विद्यार्थी, शेतकरी, प्रवासी आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रस्त्यावर खडी टाकून तीन वर्षे झाली, तरी प्रत्यक्ष कामाला सुरुवात होत नाही. सरकार नेमके काय करत आहे? हा जीवघेणा प्रवास कधी थांबणार? असा संतप्त सवाल रिलस्टार अश्विनी कुलाळ यांनी उपस्थित केला.

पाडोशी ग्रामस्थांनी प्रशासनाला दहा दिवसांत रस्त्याचे काम पूर्ण करून वाहतुकीसाठी मार्ग खुला करण्याची मागणी केली आहे. निर्धारित मुदतीत काम सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

यावेळी रिलस्टार राहुल कुलाळ, अश्विनी कुलाळ, लक्ष्मण नाडेकर, राजू साबळे, शिवराम साबळे, शिवराम नाडेकर, पांडुरंग कुलाळ, सत्यभामा कुलाळ यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

एकल महिलांच्या प्रश्नांवर राष्ट्रीय चर्चासत्र; धोरणनिर्मितीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल!

दिल्लीतील विज्ञान भवनात देशभरातील संस्था, अभ्यासक आणि कार्यकर्ते एकत्र



● **अकोले । वीरभूमी–**

एकल महिलांच्या विविध प्रश्नांवर राष्ट्रीय स्तरावर धोरण तयार करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय महिला आयोगाच्या पुढाकारातून नवी दिल्लीतील विज्ञान भवनात राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. देशभरातील महिला संघटना, अभ्यासक, अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणणारा हा उपक्रम ठरला.

या चर्चासत्रासाठी साऊ एकल महिला समितीला निमंत्रित करण्यात आले होते. समितीचे राज्य निमंत्रक हेरंब कुलकर्णी यांच्यासह समितीशी संबंधित विविध संस्थांमधील पाच एकल महिलांनी सहभाग घेतला. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी अध्यक्षीय भाषणात हेरंब कुलकर्णी यांच्या कार्याचा विशेष उल्लेख केला. सरकारशी समन्वय साधून सामाजिक संस्था एखादा विषय प्रभावीपणे पुढे नेऊ शकतात, हे कुलकर्णी यांनी दाखवून दिल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी हेरंब कुलकर्णी यांनी महाराष्ट्रात एकल महिलांसाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. जिल्हा परिषदांकडून करण्यात आलेली सर्वेक्षणे, शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांची केलेली मोजणी, बालसंगोपन योजना, उच्च शिक्षण विभागाचे प्रयत्न, बचत गटांतील एकल महिलांसाठी तालुकास्तरावर आयोजित रोजगार कार्यशाळा आणि राज्य सरकारच्या एकल महिला धोरणाबाबत त्यांनी भूमिका मांडली. ज्येष्ठ एकल महिलांचे प्रश्न, मालमत्तेवरील हक्क आणि न्यायालयीन प्रक्रियेतील विलंब याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

राष्ट्रीय महिला आयोगाने विविध राज्यांतील योजनांचे एकत्रीकरण करून देशपातळीवरील एकल महिला धोरणाचा मसुदा तयार करावा. तसेच पुढील वर्षीच्या जनगणनेपूर्वी सर्व राज्य सरकारांना हे धोरण लागू करण्याबाबत निर्देश द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी एकल महिलांना सामाजिक स्तरावर भेडसावणाऱ्या अडचणी मांडल्या. केंद्र सरकारकडून सुरू असलेल्या प्रयत्नांची माहिती देताना योजनांमधील अडथळे दूर करून एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ आणि सामाजिक सन्मान मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

चर्चासत्राच्या समारोपप्रसंगी उपस्थित कर्नाटकच्या राज्यपाल डॉ. सुधा यादव यांचे भाषण लक्षवेधी ठरले. त्यांनी छापील भाषण बाजूला ठेवून स्वतःचा एकल महिला म्हणून जीवनप्रवास उपस्थितांसमोर मांडला. विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी आणि अभ्यासकांनीही महत्त्वपूर्ण सूचना केल्या. स्नेहालय संस्थेचे ॲड. शाम असावा यांनी एकल महिलांच्या प्रश्नांशी संबंधित विविध कायदेशीर मुद्दे उपस्थित केले.

गावपातळीवर सातत्याने मांडले जाणारे प्रश्न राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठावर चर्चिले जाणे आणि त्यासाठी स्थानिक अनुभव मांडण्याची संधी मिळणे, हा समाधानाचा क्षण असल्याची भावना हेरंब कुलकर्णी यांनी व्यक्त केली. विशेषतः ग्रामीण भागातील एकल महिलांना थेट दिल्लीतील राष्ट्रीय व्यासपीठावर सहभागी करून घेता आल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय महिला आयोगाने एकल महिलांच्या दुर्लक्षित प्रश्नांची दखल घेऊन राष्ट्रीय स्तरावर चर्चेची सुरुवात केल्याने भविष्यात देशव्यापी धोरणनिर्मितीला दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

सरस्वती विद्यालयात 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियानाचा १४ वा आठवडा उत्साहात

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

अहिल्यानगर शहर डेंग्यूमुक्त करण्याच्या उद्देशाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' साप्ताहिक उपक्रमाच्या १४ व्या आठवड्याचा कार्यक्रम केडगाव येथील सरस्वती प्राथमिक व माध्यमिक विद्या मंदिर, देवी रोड, प्रभाग क्रमांक १७ येथे उत्साहात पार पडला. या उपक्रमाला अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर यांनी केले. त्यांनी शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचे महत्त्व सांगितले. डेंग्यूमुक्त शहरासाठी प्रत्येक नागरिकाने आपल्या घरापासून स्वच्छतेची सुरुवात करावी, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी डेंग्यू प्रतिबंध या विषयावर आकर्षक जनजागृतीपर नाटिका सादर केली. या नाटिकेतून डासांची उत्पत्ती कशी होते, डेंग्यूचा प्रसार कसा रोखता येतो आणि नागरिकांनी कोणती काळजी घ्यावी, याचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातून उपस्थितांना स्वच्छता आणि आरोग्याचा महत्त्वपूर्ण संदेश मिळाला.

महानगरपालिकेचे उपायुक्त हरिकल्याण येलगट्टे यांनी आपल्या भाषणात डेंग्यू आजाराची कारणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांची माहिती दिली. घराच्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी व टाक्या नियमित स्वच्छ ठेवणे, आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळणे या गोष्टी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी केवळ स्वतःपुरती काळजी न घेता आपल्या कुटुंबात आणि परिसरातही डेंग्यू प्रतिबंधाबाबत जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले.

नगरसेवक मनोज कोतकर यांनी आपल्या भाषणात प्रभाग क्रमांक १७ मध्ये स्वच्छता आणि आरोग्यविषयक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन केले.नगरसेविका अश्विनीताई सुमित लोंढे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, केडगावचे वैद्यकीय अधिकारी डॉ. गिरीश दळवी, विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर, डॉ. परमेश्वर काळे, प्रभाग अधिकारी सुखदेव गुंड, स्वच्छता निरीक्षक राजेंद्र सामल, भारतीय किसान संघाचे जिल्हा मंत्री निलेश चिपाडे, सामाजिक कार्यकर्ते वैभव कदम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.